# ✺ जी.एस.सर - माझा आधारवड ✺

I. हॅलो, मी श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.,इस्लामपूर बोलतेय. दिनांक २ मे १९९२ रोजी माझ्या नावाची रीतसर नोंदणी जिल्हा उपनिबंधक कार्यालय,सांगली येथे झाली. पण नोंदणीपूर्वीच माझे नामाभिदान श्री गुरुदत्तांच्या कृपाशिर्वादाने श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था असे करण्यात आले होते. १५ जून १९९२ रोजी माझ्या कार्याचा आरंभ झाला. माझी निर्मिती,संगोपन,लाड,कोडकौतुक करतानाच मला शिस्त लावून शिस्तबध्द करण्याचे कामही माझ्या आधारवडानी म्हणजे जी.एस.सर आणि पी.बी.सर यांनी केले. माझ्या बाल्यावस्थेपासून किशोरावस्थेपर्यंत आणि माझ्या रौप्यमहोत्सवापर्यंत माझे सर्व सोपस्कार सरांनी अत्यंत विश्वासाने,चिकाटीने,धैर्याने आणि प्रचंड आत्मविश्वासाने पार पाडले. नुकताच माझा रौप्यमहोत्सवी सांगता समारंभ प्रचंड उत्साहात संपन्न झाला. आज माझी प्रधान कार्य़ालय,इस्लामपूर शाखा आणि शिराळा शाखा अशी कार्यालये कार्यरत आहेत. आज माझ्या वयाला २५ वर्षे पूर्ण झाली असली तरी मी माझ्या लहानपणापासून जी.एस.टॉनिक घेत असलेमुळे सशक्त,गुटगुटीत आणि बाळसेदार बाळ होते. यात जी.एस.सरांचा सिंहाचा आणि सिंहाचाच वाटा आहे याचे मला पूर्ण भान आहे. सर्वानीच लहानपणापासून माझी काळजी घेतलेने आजमितिला माझी रौप्यमहोत्सवी सांगता झाली असली तरी माझा जोम,उत्साह आजरोजी टवटवीत आहे. जी.एस.सर, खरोखरच अंत:करणपूर्वक कबूल करते की हे सर्व आपणामुळे आणि फक्त आपणामुळेच शक्य झाले. नाहीतर सहकारी क्षेत्रात पावसाळी छत्र्यांप्रमाणे पतसंस्थांचे पेव फुटलेले दिसते. त्याचबरोबर त्या कालौघात अवसायनाकडे आणि तदनंतर बंद करणेकडे वाटचाल करीत असतात. मी आज जी ताठ मानेने,दिमाखात,डौलात उभी आहे ती फक्त आणि फक्त सर तुमच्या पुण्याईवर आणि अपार,अखंड,सातत्याने केलेल्या खडतर परिश्रमावर उभी आहे.

II. माझेविषयी लिहणे म्हणजे सर,तुमच्याविषयी लिहणे. कारण माझी माझी प्रगती,माझे कौतुक,माझे पुरस्का नव्हे तर अवघे माझे जीवनच हे सर तुम्हाला सर्वस्वी बहाल केलेले होते. मला पाच वेळा जिल्हा आदर्श पतसंस्था पुरस्कार मिळाला,प्रतिबिंब हा पश्चिम महाराष्ट्रातील प्रतिष्ठेचा पुरस्कार दोनदा मिळाला आणि या सर्वांवर कळस म्हणून की काय महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण पुरस्कार मिळून माझी इस्लामपुरातून ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढून जो जाहीर सन्मान केलात. या सर्व बाबी कोणामुळे शक्य झाल्या हे सर्व सुज्ञ कृतज्ञतापूर्वक जाणतात बोलतात आणि प्रसंगी हळहळतात. सर यात तुमचे कर्तृत्व,नेतृत्व,पितृत्व आणि उद्यमशीलता सर्वांना पदोपदी जाणवते. या सर्व बाबी मिळविण्यात,यशस्विता प्राप्त करण्यात आपला मोलाचा वाटा आहे याचा मला रास्त आणि रास्त अभिमान आहे. पण सर,१५ जून २०१७ रोजीच्या कार्यक्रमापूर्वीच आपण Exit घेतलीत आणि मला पोरकं करुन सोडलंत. मला ही खंत कायम सलत राहील. आपला सहवास,मार्गदर्शन ९ आक्टोबर २०१६ रोजी एका श्वासाने संपविला. पण मला मात्र प्रत्येक श्वास घेताना पावलोपावली,पदोपदी,श्वासाश्वासात आपली चिरंतन स्मृती सदैव आठवत राहील. सर,मला प्रत्यक्ष आपल्याशी कधिही बोलता आले नाही. पण अशा त-हेने माझ्यावर

तुमच्याविषयी लिहण्याची पाळी यावी हा केवढा दैवदुर्विलास..! पण जी.एस.सर आज या निमित्ताने मी माझ्या भावनांना आवर घालणार नाही. त्यांना बोलू देणार आहे. माझी आपलेविषयीची भूमिका मला मांडूद्यात सर. मला सामर्थ्य द्या,शक्ती द्या. मला लिहण्याची परवानगी द्या. कारण माझ्या जन्मापासून आपल्या अंतिम श्वासापर्यंत आपण मला तळहाताच्या फोडासारखे जपलेत. माझे चरित्र,अभिरुची,सौंदर्य आणि माझ्या अंगी असणा-या अनेक नव्हे तर सर्व गुणांचे निमीते,विधाते,जनक आणि पुरस्कर्ते तर सर आपणच आहात. म्हणून मला चार शब्दातून माझी मनोवेदना सांगूद्यात सर..

III. अहो,माझे ऑडिट हा तर तुमचा जीव की प्राण. तुमच्या दृष्टीने माझे ऑडिट ही आनंदाची पर्वणी. तुम्ही मला कोणकोणत्या अंगानी सजवून,नटवून,स्वाभाविक सौंदर्याचा अविष्कार घडवून परीक्षेसाठी पाठविले असेल ते एक परमेश्वरच जाणे..माझ्या तारुण्यावस्थेत एक आणि एकदाच एक तारुण्यपिटिका(ऑडिटवर्ग ब) उठली होती. पण तुम्हाला ते ही सहन झाले नाही. मला पुण्याला नेऊन आपण पतीपत्नीनी औषधोपचार(सहकार आयुक्त पुणे कार्यालय) करुन माझे सौंदर्य पूर्ववत करुन आणलेत ही प्रगाढ प्रेमाची ऊब मला कायम दिलीत. पण आपण केलेले प्रेम,श्रम,कष्ट,पाठबळ यांना मी कधिही विन्मुख होऊ दिले नाही. कायम आणि कायम त्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. मी कायम अव्वल राहीले. माझी सातत्याने उत्तमात उत्तम असणारी,सातत्याने चढती कमान ही जी.एस.सर तुमचीच कमाल आहे. अहो, माझा ताळेबंद,माझे नफा-तोटापत्रक,माझे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक आणि ते ही दहवर्षी न चुकता सातत्याने मांडणी करण्याची तुमची विलक्षण हातोटी होती. माझा एक रुपयाचा ताळेबंद मांडणे आणि पुढील पाच वर्षाचे अपेक्षित नियोजन करणे ही सर तुमचा विलक्षण छंद आणि हट्ट होता.

IV. नेमेची येतो मग पावसाळा या नात्याने दरवर्षी होणारी माझी वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणजे सर तुम्हाला भाषणबाजी करण्याची येणारी सुरसुरी आणि मिळालेली हक्काची संधी. तीनच्या सभेला साडेतीन वाजले की सभा सुरु करण्याची पी.बी.सरांची गडबड आणि स्थितप्रज्ञासारखी सभासदांची चातकासारखी वाट बघण्याची तुमची तटस्थता. मला तर बाई तुमच्या दोघांच्या स्वभावाची गंमतच वाटून रहायची. कारण परस्परविरोधी विचारांची मांदियाळी असुनही तुम्ही २५ वर्षे मला एकमुखी नेतृत्व आणि निर्णयक्षमता दिलीत हा अत्यंत दुर्मिळ गुण तुमच्या दोघांच्या अंगी होता. वार्षिक सर्वसाधारण सभेतील आपले प्रास्ताविक असो,किंवा अध्यक्षीय भाषण असो, सभासदांना कायमस्वरुपी दिवाळीच्या फराळाचा परमानंद असे. कारण अथपासून इतिपर्यंत सगळं कसं मनसोक्त,मनमुराद,तत्वशुध्द,अभ्यासपूर्ण आणि आकंठ तृप्ती देणारे मार्गदर्शन ही पर्वणी होती. मराठई सारस्वताला पंढरीची वारी होती. सर, खरं बोलायचं तर आपले सभासद आषाढी कार्तिकीला वारकरी जसे वारीला पंढरीला टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठलाच्या दर्शनाला जातात तसे ते आपल्या सभेस हजर रहात असत. सर, यंदा आम्ही काय करायचे आणि येथून पुढे सर्व सभासदांना काय सांगून आपली उणीव भरुन काढावयाची ते सांगाना..कारण वार्षिक सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील विषयांपेक्षा तुमची रसवंती,जोश आणि तत्वप्रचुर भाषणांमुळे सभासदांचे कान तृप्त होत. मागील १४ ऑगष्टच्या सभेस तब्येत बरी नसतानासुध्दा आपण फार बोलणार नाही म्हणून सभासदांशी जेवणापूर्वी आणि जेवणानंतर तासभर गप्पा मारीत होतात सर, तुम्हाला तुमचे तिकडे जाणे समजले होते, पण

आम्हाला त्यावेळी तुमच्यावरील प्रेमामुळे ते कळले नाही. त्यामुळे तुमची ही सभासदांशी झालेली जाहीर स्वरुपातली शेवटची भेट. विषयपत्रिकेवरील सर्व बाबींचा समाधानकारक आणि खुलासेवार आढावा घेतल्याशिवाय तुमचे समाधान होत नव्हते. स्वतःच्या कुटुंबियांची जेवढी आस्थेने कोणी काळजी घेईल त्यापेक्षा जास्त काळजी तुम्ही माझी आणि माझ्या सभासदांची घेत होता. आपुलकीने वागत होता. त्या सर्वांना तुमच्या भाषणामुळे दिलासा मिळत होता,उर्जा प्राप्त होत होती.

V. श्री दत्त नागरी म्हणजे मी एक कुटुंब,एक परिवार. आपण माझी निर्मिती केलेमुळे आज आपले परिवारात सुमारे २० सेवकवर्ग आणि २० धनवर्धिनी एजंट कार्य़रत आहेत. माझ्या माध्यमातून आपण अनेकांचे संसार,प्रपंच मार्गी लावलेत. हे सर्वजण आपले प्रती कृतज्ञच आहेत. मात्र माझ्याप्रमाणेच त्यांना त्यांच्या भावना,विचार सुसंगतपणे शब्दबध्द करता येत नाहीत. पण त्या सर्वांच्या भावना,धारणा संवेदनशील,कृपाशील आणि कृतार्थतेच्या आहेत. खरं तर मी फक्त माध्यम आहे पण माझे जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या आणि अत्यंत पारदर्शी व्यवहार करण्याच्या माध्यमातून आपण जी जनसेवा केलीत तिला तोड नाही. ती लाजवाब आहे. समाजाला मदत करणे,दिलासा देणे,समाजाभिमुख विकास करणे ही तर आपली खासियत होती. सर्वांवर पुत्रवत प्रेम केलंत,मार्गदर्शन केलंत,शिस्त लावलीत,आयुष्याला वळण आणि वळणे लावलीत,दिलीत. सर, आपण दाता होतात. दातृत्व हा आपला स्थायीभाव होता. " देता घेशील किती दो कराने " अशी आपल्या परिवारातील सर्वांचीच अवस्था होती. कारण सेवकवर्गासाठी भविष्यनिर्वाहनिधीची सोय,सेवानियम,सेवापुस्तिका या सहकारात अपवादाने आढळणा-या सर्व बाबी आपण माझ्या कर्मचा-यांना सहजतेने उपलब्ध करुन दिल्यात आणि त्यांचा दुवा घेतलात. दिवाळीचा बोनस ही सर्वांना पर्वणीच असे. कारण साधारणपणे आपण सेवकांना दोन महिन्याच्या पगाराइतका बोनस दरवर्षी बहाल करत असत. सैन्य पोटावर चालते हे ऐकून होते. पण आपले सैन्य बोनसमुळे पंचपक्वान्नावर चालते हे ठाऊक नव्हते. माझ्या स्थापनेपासून आजपर्यंत आपण माझ्या सर्व सभासदांना भरघोस लाभांश देऊन त्यांच्या विश्वासार्हता जपल्यात. अगदी पहिल्या वर्षापासून आपण लाभांश दिलात. आज सहकारात जी जास्तीत जास्त लाभांशाची १५% तरतूद आहे ती आपण पूर्ण करुन सभासदांना आनंद दिलात. N.A.V. ही कल्पना आणि संकल्पना पतसंस्थेत फक्त आपणच आणलीत.

VI. आपणाविषयी लिहायचं आणि विचार करायचा म्हटलं तर तो एक प्रबंधाचा विषय होईल. सर कोणालाही माहिती नसलेली एक बाब आणि आपली खंत मांडते. तुमच्या मताप्रमाणे मी एक संशोधनाचा विषय होते. माझ्यावर संशोधन व्हावे आणि त्याला समाजमान्यता मिळून ते प्रसिध्द व्हावे अशी आपल्या उभयतांची तीव्र इच्छा होती. पण सर,कष्ट न करता सुधारक बनवणा-या गोष्टी झटपट सर्वत्र होतात. त्याशिवाय नेतृत्वाचा संबंध पितृत्वापेक्षाही कर्तृत्वाशी असायला हवा. शेंदूर फासलेला प्रत्येक दगड म्हणजे काय 'जागृत दैवत' असतं काय? प्रतिभा जागृत करणारी माणसं आणि प्रसंग निराळेच असतात. स्वतःला होणा-या यातनांसाठी मोठं भांड वापरायचं पण इतरांच्या संदर्भात, एका अश्रुनंही भांड ओसंडून जाईल इतकं छोटं ठेवायचं. या सर्वांपेक्षा तुमचे विचार वेगळे,स्वतंत्र आणि कालातीत होते. कारण पारिजातकाचं आयुष्य लाभलं तरी चालेल पण लयलूट करायची ती सुगंधाचीच. जनता

जनार्दनाला हे कळणेस वेळ लागेल. कोणत्याही गोष्टीची वेळ यावी लागते. कारण प्रत्येक यशस्वी ठरलेल्या माणसाच्या आयुष्यात 'वेटिंग पिरियड' असतो. मी आशावादी आहे. प्रतिक्षा संपणेच्या प्रतिक्षेत आहे. माझ्यावर भविष्यात संशोधन होईल ही मी आपणास ग्वाही देते.

VII. मला आता उपसंहाराकडे वळलेच पाहिजे. कारण मी कितीही लिहिले तरी आपण शब्दातीत आहात. माझी अवस्था एका डोळयात आनंदाश्रू आणि दुस-या डोळयात दु:खाश्रू अशी आहे. कारण तुमची दगदग,यातना,त्रास,शारीरिक आणि मानसिक ताणतणाव यातून तुम्हाला मुक्ती हवी होती. पण आपण मला निराधार करुन गेलात सर.. कारण आपण आणि पी.बी.सरांनी दोघांनीही माझ्या पाठीशी एकदिलाने आणि एकाच निर्णयाने राहणेचे वचन दिले होतेत. आपण गेल्यापासून पी.बी.सर खूपच बदललेत. पण सर, मला नियतीचा निर्णय मान्य आहे. मी तुमच्याच विचाराची,तुमचीच निर्मिती असलेमुळे हातपाय गाळून बसणार नाही. तुमचा वसा,स्वप्ने,तुमची शिस्त,संस्कार मी यापुढे चालविणार. कारण तुम्ही मला अमृताचा कुंभ बहाल केला आहे. ती संजीवनी मला माझ्या भावी जीवनात यशस्वी ठेवण्यात निश्चित प्रेरणादायी ठरेल. कारण काळ फक्त माणसाचं वय वाढवितो. आठवणींना वार्धक्याचा शाप नसतो. मी आपल्या आठवणी साठवून त्यावर माझी यशस्वी वाटचाल करीन. समारोपाच्या निमित्ताने एवढीच विनंती की आपण दिलेल्या वाटेवर आम्ही वाटचाल करु. सर्व दत्त परिवाराला आपण भरभरुन आशिर्वाद द्यावेत आणि आम्हाला भावी उत्कर्ष करण्याची प्रेरणा द्यावीत ही विनंती. आपण आठवणींच्या रुपाने कायम आमच्या अंत:करणात आहात याची मी आपणांस ग्वाही देते. माझ्या पंखात बळ द्या. मी गरुडभरारी घेणार आहे. आपली क्षितिजापलीकडून कृपादृष्टी ठेवावी ही कळकळीची प्रार्थना.......!

दिनांक- २४/०७/२०१७
उरुण-इस्लामपूर

आपली
**श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था**
**मर्यादित.,इस्लामपूर.**